**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

१९ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०४९५४३

क्र.संकिर्ण २०१९/प्र.क्र.४६/सहा दिनांक ७ जून ,२०१९

प्रति,
सह/उप सचिव (आस्थापना),
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**विषय: महाराष्ट्र राज्य माहिती आयोग येथील रिक्त पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत.**

**संदर्भ**: १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही २०११/प्र.क्र.१३७/ का.१४, दिनांक १७ डिसेंबर २०१६

२. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआयसी२०१४/ सी.आर.२८३/ १४/सहा दिनांक २२ जानेवारी २०१८

महोदय,

महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचे मुख्यालय मुंबई येथे असून बृहन्मुंबई, कोकण पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर येथे ७ कार्यालये कार्यरत आहेत.

२. राज्य माहिती आयोगाच्या विविध कार्यालयातील खालील संवर्गातील रिक्त पदे प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी मंत्रालयीन विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयाकडून इच्छुकता मागविण्यात येत आहे.

| **अ.क्र** | **पदनाम** | **मुख्यालय** | **कोकण** | **पुणे** | **नाशिक** | **औरंगाबाद** | **अमरावती** | **नागपूर** | **बृहन्मुंबई** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सचिव | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २. | उप सचिव | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ (संभाव्य रिक्त) |
| ३. | कक्ष अधिकारी | ० | ० | ० | ० | १ (संभाव्य रिक्त) | १ (संभाव्य रिक्त) | १ | १+१ (संभाव्य रिक्त) |
| ४. | उच्चश्रेणी / निम्नश्रेणी लघुलेखक | १ | २ | १ | १ | १ | १ | १ (संभाव्य रिक्त) | १ |
| ५. | सहायक कक्ष अधिकारी | ३ | ० | ० | ० | ३ | १ | १ (संभाव्य रिक्त) | ३ |
| ६. | लिपिक-टंकलेखक | ४ | ३ | २ | १ | १ | ० | १ (संभाव्य रिक्त) | ३ |
| | **एकूण** | **९** | **५** | **३** | **२** | **६** | **३** | **४** | **१०** |

३. संदर्भ क्र.१ येथील दिनांक १७ डिसेंबर २०१६च्या शासन निर्णयान्वये प्रतिनियुक्तीचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. तसेच संदर्भ क्र.२ येथील दिनांक २२ जानेवारी २०१८च्या शासन अधिसूचनेन्वये, महाराष्ट्र राज्य माहिती आयोगातील विविध संवर्गातील पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आले आहेत.

४. राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातील सचिव, उपसचिव, कक्ष अधिकारी आणि सहायक कक्ष अधिकारी, उच्च श्रेणी लघुलेखक, निम्न श्रेणी लघुलेखक, लिपिक-टंकलेखक या संवर्गातील पदांवरील नियुक्ती मंत्रालयातील कोणत्याही विभागातील संबंधित पद धारण करणा-या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही कार्यालयातील संबंधित पदाचे समतुल्य पद धारण करणा-या एखाद्या योग्य व्यक्तीच्या प्रतियुक्तीद्वारे करण्यात येईल, अशी तरतुद सेवा प्रवेश नियमांत आहे.

५. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त बाब विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या निदर्शनास आणावी. उपरोक्त नमुद रिक्त पदांवर प्रतिनियुक्तीने जाण्याकरीता इच्छुक अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यालय प्रमुखांमार्फत संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे अर्ज सादर करावा, कोणत्याही परिस्थितीत या विभागाकडे थेट अर्ज करु नये. थेट प्राप्त झालेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

६. इच्छुक अधिकारी/कर्मचारी यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतूदींनुसार अर्जांची छाननी करुन सोबत जोडलेल्या **प्रपत्र-१** मधील माहितीसह संबंधित विभागाच्या सचिवांच्या मान्यतेने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचा परिपूर्ण प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव या कार्यासनाकडे दिनांक २२ जुलै, २०१९ पर्यंत पोहोचेल अशा रितीने पाठवावा.

७. निवड झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यास त्याचे नाव मागे घेता येणार नाही. तसेच, आपल्या विभागातून सदर पदावर प्रतिनियुक्तीसाठी जाण्यास कोणीही अधिकारी/कर्मचारी **इच्छुक नसल्यास** तसेही कृपया **दिनांक २२ जुलै २०१९ पर्यंत** निश्चितपणे (थेट या कार्यासनास) कळविण्यात यावे.

८. सदर शासनपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०६०७१६५५२२७७०७ असा आहे, हे पत्र डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढलेले आहे.

**आपली,**

SHWETAMBARI PRAVIN KHADE

Digitally signed by SHWETAMBARI PRAVIN KHADE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9d702814ac9e8ff679064b8a4828e61adaa1acd78f420928f8e5191c2576b1a1, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=8e3cff5145f3538cc2fd3c8534f86eeb0ca96ee4f337faf9d77ef01a5cc23b6b, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHWETAMBARI PRAVIN KHADE
Date: 2019.06.11 16:58:50 +05'30'

**( श्वे.प्र.खडे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**सहपत्र:- वरीलप्रमाणे**

प्रत माहितीसाठी,

१. सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुंबई.

२. सह सचिव (कार्यासन क्र.१४/१४-अ/१४-ब), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

३. निवड नस्ती, कार्यासन सहा संग्रहार्थ

शासन पत्र क्रमांक संकीर्ण २०१९/प्र.क्र.४६/कार्यासन सहा, दिनांक ७ जून, २०१९ सोबतचे सहपत्र

**प्रपत्र – १**

| | | |
|---|---|---|
| १ | अधिकारी/कर्मचाऱ्याचे **संपूर्ण** नाव (केवळ अद्याक्षरे लिहू नयेत) | |
| २ | सध्याचे पदनाम (संपूर्ण नमुद करावे) | |
| ३ | जन्मदिनांक | |
| ४ | शैक्षणिक अर्हता | |
| ५ | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ६ | सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयाचा संपूर्ण पत्ता | |
| ७ | प्रथम नियुक्तीचे पद व दिनांक | |
| ८ | सध्याचे पद व या पदावरील नियुक्तीचा दिनांक | |
| ९ | सेवानिवृत्तीचा दिनांक [शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१६ मधील तरतूद ५ब(६)] | |
| १० | मागील ३ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत) | |
| ११ | दिनांक ३१.३.२०१९रोजीचे मत्ता व दायित्व सादर केली आहेत का? | |
| १२ | ५५/५० व्या वर्षी पुनर्विलोकन केले आहे का? (लागू असल्यास) | |
| १३ | संबंधित कर्मचाऱ्याला यापूर्वी प्रतिनियुक्ती दिली असल्यास तपशील (पद, कार्यालयाचे नाव व कालावधी) (प्रतिनियुक्तीचा एकूण कालावधी १० वर्षापेक्षा जास्त नसावा) | |
| १४ | मागील प्रतिनियुक्तीवरून परत आल्याच्या दिनांकापासून ५ वर्षे पूर्ण झाली आहेत का ? | |
| १५ | संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे? | |
| १६ | प्रतिनियुक्तीकरीता निवड झाल्यास विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे? | |